क्रमांक : ९७२० / ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधानभवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २५ जून, २०२१

# :: परिपत्रक ::

**विषय :- महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२१ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्न व्यपगत करण्यात आल्याबाबत**

**संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्र.८७००/ब कक्ष, दिनांक ८ जून, २०२१**

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, सन २०२१ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाकरिता मा. मंत्र्यांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता नेमून देण्यात आलेले दिवस तसेच त्या दिनांकास निश्चित केलेल्या तारांकित प्रश्नांच्या उत्तराच्या प्रती या सचिवालयास मिळण्याचा अंतिम दिनांक याबाबतची माहिती उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकाद्वारे सर्व मंत्रालयीन विभागाला कळविण्यात आली होती.

तथापि, विधानसभा कामकाज सल्लागार समितीची मंगळवार, दिनांक २२ जून, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत विधानसभेचे आगामी द्वितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक ५ जुलै, २०२१ व मंगळवार, दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले असून सदरहू अधिवेशनात प्रश्नोत्तरे, अर्धा-तास चर्चा व अन्य संसदीय आयुधे घेण्यात येणार नसल्याचे तसेच स्वीकृत प्रश्न व्यपगत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुषंगाने सन २०२१ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाकरिता विभागाकडे पाठविण्यात आलेले तारांकित स्वीकृत प्रश्न तसेच वस्तुस्थितीसाठी पाठविण्यात आलेले प्रश्न व्यपगत करण्यात आले आहेत.

(सोमनाथ सानप)
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२) मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाही अग्रेषित.